MHAU050054612025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४२४/२०२५.**

**कल्याण लक्ष्मण आवारे व इतर**

**वि.**

**निरंक.**

**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नामे लक्ष्मण सर्जेराव आवारे हे दि. २३.०९.२०१९ रोजी धोंदलगाव, ता. वैजापूर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे निर्मला लक्ष्मण आवारे हया दि. २६.०४.२०२५ रोजी धोंदलगाव, ता. वैजापूर येथे मयत झाल्या आहे. मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे एकमेव कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त मयतांना कोणीही कायदेशीर वारस नाही. तद्नंतर अर्जदारांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ३ यांना विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी तसेच इतर कायदेशीर बाबीसाठी व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी, पूर्ततेसाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झालेले आहे; म्हणून सदरचा अर्ज अर्जदारांनी मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सुचना व जाहीर प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''सामना'' या वृत्तपत्रात दि. २९.०१.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास

कळविण्यास सांगितले, परंतू अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

४. अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. एन. आर. बोराडे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करीता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असून वारसाचा दाखला मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

६. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.२ संदीप लक्ष्मण आवारे यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती करून, अर्जदार हे मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असल्याचे, तसेच अर्जदारांनी ते मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत शपथेवर कथन केले आहे. सदर अर्जासोबत दस्तऐवज यादी सोबत अर्जदारांनी मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र व अर्जदारांचे मुळ

आधार ओळखपत्राची स्कॅन प्रत दाखल केलेली आहे. तद्नंतर अर्जदारांनी पुरसीस दाखल करून त्याचा पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांतर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांनी दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्रामध्ये अर्जदार हे मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता उपरोक्त मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते.

८. अर्जदारांनी अभिलेखावरती दाखल केलेल्या उपरोक्त पुराव्याबाबत शंका घेण्याची परिस्थिती दिसून येत नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीताः</u>–

९. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेला आहे. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १. कल्याण लक्ष्मण आवारे, अर्जदार क्र.२. संदिप लक्ष्मण आवारे व अर्जदार क्र.३. वर्षा नंदु शेवाळे हेच मयत लक्ष्मण सर्जेराव आवारे व निर्मला लक्ष्मण आवारे यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHAZIYA KHAN
Date: 2026.04.10 17:00:57 +0530

दिनांकः १०.०४.२०२६ **(श्रीमती एस. के. खान)**

वैजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.